पं. सुरेश तळवलकर हे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत क्षेत्रातले एक मोठे व्यक्तिमत्त्व आहे. एक कलाकार, एक अभ्यासक, एक भाष्यकार आणि एक गुरु! एका व्यक्तिमत्त्वाचे हे सर्व आयाम एकमेकांना समृद्ध आणि उन्नत करीत आले आहेत. सुरेशदादांच्या 'तालयोगी आश्रम' या गुरुकुलाची तपपूर्ती होत आहे. सुरेशदादांचे गुरुपदाचरण हे काही तपापेक्षा वेगळे नाही. म्हणूनच त्यांना 'शापादपि, शरादपि' सिद्धी प्राप्त झाली आहे. गुरू म्हणून सुरेशदादांनी जे आणि जसे केले आहे ते गुरुपदाच्या शक्तीची साक्ष देणारे आहे.

कलासाधना ही फावल्या वेळात करण्याची, छंदाची बाब नाही, तर ती पूर्णवेळाची बांधीलकी मागणारी बाब आहे ही गोष्ट सुरेशदादांनी वाचेने आणि कृतीने सिद्ध केली आहे. तीस एक वर्षांपूर्वी, किंवा त्याही पूर्वी असेल, सुरेशदादा आग्रहाने सांगत की बालवयात संगीताचे शिक्षण घेणाऱ्या, विशेष गुणवत्ता धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय / महाविद्यालयीन पूर्णवेळ क्रमिक अभ्यासाच्या चक्रातून संगीताध्यायनासाठी मोकळे केले पाहिजे. संगीताध्ययनाचा आवाका सुस्पष्टपणे आकलन झाल्याशिवाय असा विचार मनात तरी येणे शक्य आहे का? अशा प्रकारचे, केवळ विधान करण्याचे नव्हे तर तास सल्ला देण्याचे धाडस, गुरू म्हणून प्रचंड आत्मविश्वास असल्याशिवाय शक्य आहे का? सत्यजित आणि सावनी ही सुरेशदादांची अपत्ये. त्यांच्या शालेय/ महाविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतीत दादांनी (आणि पद्माताईंनीही) आपल्या विचारांवर ठाम राहून निर्णय घेतले आणि "आधी केले, मग सांगितले" या उक्तीचा वस्तुपाठ उभा केला.
दादांचे काही शिष्य उच्चविद्याविभूषित आहेत. शालेय, महाविद्यालयीन शिक्षणाचे मूल्य दादा जाणत नाहीत असे मुळीच नाही. अगदी संगीत शिक्षणातही संस्थाकीय

शिक्षणाचे स्थान दादा नेमके जाणतात. सांगण्याचा मुद्दा हा आहे की गुरु शिष्य परंपरेची शिष्य घडण्यासाठीची मागणी काय आहे हे दादांनी अधोरेखित केले आहे आणि त्यातून शिष्याची - खरेतर विद्यार्थ्यांच्या पालकांची मानसिक तयारी आणि गुरूंची जबाबदारी काय आहे हे ही स्पष्ट केले आहे.

तबला हा पूर्णवेळ व्यवसाय म्हणून करण्यासाठी दादा प्रोत्साहन देतात. किंबहुना थेट शिष्यत्वासाठी दादांचा तसा आग्रह असतो. तबल्याइतकीच चांगल्या नोकरी किंवा अन्य व्यवसायाची क्षमता ज्या शिष्यांच्या अंगी होती अशा काही शिष्यांनी तबला ही पूर्णवेळ वृत्ती स्वीकारली. यातही दादांच्या प्रोत्साहनाचा, आत्मविश्वास आणि ध्यास उत्पन्न करण्याचा मोठा वाटा आहे. 'तबलावादनाचे कौशल्य आपल्या परीने विद्यार्थ्याला अवगत करून देणे' एवढेच कोमट ध्येय दादांच्या प्रकृतीला मानवात नाही. दगडावरही उगवेल असा शिष्य घडवणे हा त्यांच्या गुरुपदाचा पुरुषार्थ आहे.

दादांनी आपल्या गुरूकुलाला ' आश्रम ' संबोधले. काही जणांनी भुवया उंचावल्या. दादांचे हे नामभिधान आत्मगौरवासाठी नाही तर कर्तव्याच्या, जबाबदारीच्या जाणीवेसाठी आहे. दादांच्या चाहत्यांची संख्या मोठी आहे. त्यांच्या आस-पास असणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. 'दादांचे वचन प्रमाण' अशी निष्ठा असणारेही कमी नाहीत. अर्थात काही वेळा, काही जाणांना दादांचा सांगीतिक 'संप्रदाय' आहे असे वाटते. पण दादा सांप्रदायिकतेच्या पलीकडे केंव्हाच पोचलेले आहेत. वैयक्तिक अढी, वाद, पूर्वग्रह यांतून संगीतासाठी त्यांनी स्वतःला सोडवून घेतले आहेच. पण याही पुढे जाऊन आपल्या सांगीतिक प्राधान्यक्रमाच्या पलीकडे जाऊन आपल्याला फारसे न रुचलेले संगीत बघण्याची मानसिकता दादांनी विकसित केली आहे.

आपल्याला ज्या सांगीतिक मूल्यांचा साक्षात्कार झालेला आहे ते मुद्दे हिरीरीने मांडणारे दादा, अशा मांडणीत अभिनिवेष नाही ना हे तपासून पाहतात!
दादांच्या षष्ठ्यब्दीपूर्तीच्या वर्षी एका मुलाखतीत त्यांना विचारले गेले की मागे वळून बघताना काय जाणवते? या प्रश्नावर अत्यंत प्रामाणिकपणाने दादांनी सांगितले की, “काही गीष्टींचा-विशेषतः तंत्रांच्या गोष्टींचा अभ्यास त्या त्या वयात व्हावा लागतो आणि माझा काही अभ्यास राहून गेला.” केवढा हा प्रांजळपणा! पण त्यांचा मोठेपणा या पुढेच आहे. आपले जे राहून गेले ते आपल्या शिष्यांचे मुळीच राहता कामा नये यांची पूर्ण दक्षता दादांनी घेतली आहे. “क्रॉस टिचिंग” असे नाव या दक्षतेला त्यांनी दिले आहे. कोणत्याही क्षेत्रात आणि शास्त्रीय संगीत क्षेत्रात तर नक्कीच, बरीच बुवाबाजी चालते - या अर्थाने की गुरुकडे ज्याचा अभाव असेल अशा गोष्टींना तुच्छ म्हणून टाकणे. ज्या अन्य कलाकारांकडे त्या गोष्टी चांगल्या असतील त्यांचा द्वेषमूलक उपहास करणे. दादा या बुवाबाजीपासून कटाक्षाने दूर राहिले आहेत. गुरूंच्या मार्गावरील या निसरड्या वळणांवर दादांनी स्वतःला फार खंबीरपणे सांभाळले आहे.

सुरेशदादांचा संगीताकडे पाहण्याचा दृष्टिकोन समग्र आहे. तबला हे त्यांचे वाहन आहे, आणि गायन, तंतूवाद्य वादन, नर्तन या संगीतावकाशात ते या वाहनावरून अवगाहन करीत असतात. गाण्याचा आनंद हे सर्वात महत्त्वाचे संगीत साध्य आहे हा संस्कार त्यांच्याकडून आपोआपच त्यांच्या शिष्यांवर होत असतो. सुरेशदादा एक कलाकर्ते(Performer) गुरू आहेत. त्यामुळे प्रस्तुतीसाठी आवश्यक अशी मनोभूमिका काय असते हे त्यांच्या मंचीय प्रस्तुतीतून शिष्यांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळते. परंपरेचे- बंधन नाही तर बांधिलकी- दादांच्या आचार विचारांत आहे. त्यामुळे त्यांचे सत्शिष्य गतानुगतिक किंवा दुसऱ्या टोकाला बेबंद बंडखोर बनू शकत नाहीत.

एका महोत्सवात एक कथक नर्तक आपली कला सादर करीत होता. त्याने सुरेश दादांकडून लय तालाचे मार्गदर्शन घेतले होते. त्या कार्यक्रमाला महोत्सवात सहभागी झालेले वीस एक गायक वादक हजर होतेच, पण खुद्द सुरेश दादाही हजर होते. नर्तक कथक मधला लाय-ताल पक्ष प्रेमाने आणि तयारीने सादर करीत होता. त्याला तबला साथ करणारा साथीदारही दादांचाच शिष्य होता. एवढेच नाही तर अन्य साथीदारांनीही लय तालासाठी दादांचे मार्गदर्शन घेतले होते. कार्यक्रम संपता संपता दादांनी त्या नर्तकाला सुचविले, “अनाघात” - ( तालाच्या मुख्य आघाताला हुलकावणी देणारी रचना ) आणि त्या संपूर्ण चमूने तत्काळ ‘अनाघात‘ नमुने सादर करायला सुरुवात केली! प्रेक्षकांत एका नर्तक कलावतीचे पतिदेव बसले होते. तेही दादांकडे तबला शिकत होते, पण आपल्या हौसेपुरते. ‘अनाघातांचे’ बोल तेही मंचावरील कलाकारांबरोबर म्हणत होते. कार्यक्रम संपल्यावर कुणी त्यांची तारीफ केली की ते बोल त्यांना मुखोद्गत होते म्हणून. त्यावर ते म्हणाले - मलाच काय, दादांच्या सुमारे एक हजार शिष्यांना हे बोल मुखोद्गत आहेत! ते बोल तबला शिक्षणातले प्राथमिक स्तराचे बोल नव्हते - चांगल्या प्रगत स्तरावरचे बोल होते! सुरेश दादांचे हे योगदान आहे!

सुरेशदादांचे सर्वच शिष्य एका उच्च पातळीच्या तयारीचे असतात, दादा त्यांच्याकडून रीतसर तसा अभ्यास करून घेतात. या पेक्षाही स्पृहणीय बाब लक्षात येते की दादांच्या अनेक शिष्यांची स्वप्रतिभा दादांच्या अध्यापनात, दादांच्या सान्निध्यात बहरात येते. आपली आपली संगीत सौंदर्याची नजर तयार होते आणि आपापल्या ‘अंदाजाचे‘ दर्जेदार सृजन घडते. हे घडण्यासाठी गुरुकुलात ड्रिलिंग, टास्क मास्टरींग या पलीकडे बरेच काही घडत असले पाहिजे! तालयोगी आश्रम हा  अभ्यासवर्ग नाही, विद्यालयही

नाही, तर ते एक गुरुकुल आहे. या गुरुकुलात तंत्र शिकवले जाते - हाताची तयारी करून  घेतली जाते, एकाग्रतेला पोषक असे वातावरण तयार करून बुद्धी तीक्ष्ण केली जाते., शास्त्र  सांगितले जाते, विद्येची ओढ - व्यासंग उत्पन्न केला जातो आणि कलानिर्मितीसाठी आवश्यक असे नवोन्मेष जपले जातात. म्हणजेच, 'शिकवणे' नव्हे इथे 'घडविणे' घडत असते. या निवासी गुरुकुलात आयुष्यातील नेमक्या वयात, नेमक्या कालावधीत अनेक विद्यार्थी घडले आहेत, अनेक कलाकार उदित झाले आहेत.

आपल्या गुरुकुलात तर दादा आपले शिष्य घडवतातच, पण 'शहाणे करुनी सोडावे सकाल जन' हे ब्रीद अनुसरून दादा कार्यशाळांच्या माध्यमातून अनेकानेक विद्यार्थ्यांना नेमके मार्गदर्शन करतात. विद्यार्थी सामान्यतः कुठे अडकतात हे दादांना नेमके माहित आहे. कार्यशाळांतून दादा नेमकेपणाने अध्ययनातले हे अडथळे दूर करतात. ख्याल गायनाच्या अनेक विद्यार्थ्यांना लय तालाचा - हुकमी समेवर येण्याचा - आत्मविश्वास नसतो. दादा आपल्या कार्यशाळांत बोटाला धरून अशा विध्यार्थ्यांना चालायला शिकवतात.

तालयोगी आश्रमाच्या तपपूर्तीनिमित्त पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात ४ एप्रिल २०२३ या दिवशी पं. सत्यजित तळवलकर यांचे एकल तबलावादन आणि पं. उल्हास कशाळकर यांचे गायन अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला शंकराचार्य विद्यानृसिंहभारती आणि विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर हे यथायोग्य प्रमुख पाहुणे लाभले आहेत दादांच्या वयाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. झाडावर पिकत असलेल्या फळात जशी प्रत्येक कणाची साखर होत

**असते तसे दादांचे व्यक्तिमत्व ‘अमृतमय’ बनले आहे. दादांना दीर्घायु, उत्तम आरोग्य आणि अम्लान आनंद मिळत राहो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!**

**- श्री केशव परांजपे**